**परदेशातील वैद्यकीय मदतीसाठी परकीय चलन विषयक उदारीकरणासाठी**
एपी (डीआयआर सिरीज) प्रसिद्धीपत्रक क्र. १७८ १२ सप्टेंबर २००२

भारतीय रिझर्व बँक,
एक्सचेंज कंट्रोल विभाग
मध्यवर्ती कार्यालय,
एपी. (डीआयआर सिरीज) प्रसिद्धी पत्रक क्र. १७
सप्टेंबर १२, २००२

प्रति,
**परकीय चलन व्यवहार करणारे सर्व अधिकृत व्यापारी,**

प्रिय महोदय/महोदया,

**परदेशातील वैद्यकिय मदत मिळण्यामध्ये परकीय चलन देवाण घेवाणीचे उदारीकरण करण्याबाबत**

परदेशातील डॉक्टर/रुग्णालयामध्ये भारतातील डॉक्टरांनी केलेल्या वैद्यकीय मदतीच्या अंदाजपत्रकाप्रमाणे परदेशातील भारतीयांना वैद्यकीय मदत मिळण्यासाठी सर्व अधिकृत व्यापाऱ्यांनी जी एस,आर ३८१ (ई) च्या अनुक्रमांक ९ शेड्यूल ३, दिनांक ३मे, २००० या प्रसिद्धी पत्रकातील तरतूदीकडे लक्ष द्यावे.

२) कोणत्याही स्वरुपाचे वैद्यकीय मदतीसाठीचे अंदाजपत्रक भारतातील डॉक्टर/रुग्णालयांकडून न घेता भारताबाहेर राहणाऱ्या भारतीय रहिवाशांसाठी वैद्यकीय मदत रु. ५००० यू.एस. डॉलर्स किंवा त्याचे इतकी रक्कम कोणत्याही अडचणींशिवाय देण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सर्व अधिकृत व्यापारी ५००० डॉलर्स पर्यंतची मदत करु शकतात.

३) यासाठी भारताबाहेरील भारतीय रहिवाशांनी अशी वैद्यकीय मदत घेऊन त्याचे देय हे डिमांड ड्राफ्ट द्वारा करायचे आहे असे लिहुन घेणे जे अधिकृत व्यापारी परकीय चलनाची ५००० डॉलर्सची मदत करणार आहेत त्यांचेवर बंधनकारक आहे.

४) या प्रसिधीपत्रकातील माहीती संबंधी व्यक्तींना अधिकृत व्यापाऱ्यांनी द्यायची आहे.
५) परकीय चलन व्यवस्थापन कायदा १९९९(४२/१९९९) च्या कलम दहा (४) व कलम ११ (१) च्या तरतुदीनुसार सदर दिशानिर्देश केले आहेत.

आपला विश्वासू
(ग्रेस कोशी)
मुख्य महा व्यवस्थापक